# वरिष्ठ महाविद्यालय पाटपन्हाळे

जिमखाना विभाग

वार्षिक अहवाल

(२०११-१२)

- **जिल्हा स्तरीय मॅरेथॉन स्पर्धा (चिपळूण) :**

मंगळवार दि. ९ ऑगस्ट २०११ रोजी आकार आर्गनायझेशन, देवरूख यांनी आयोजित केलेल्या जिल्हा स्तरीय मॅरेथॉन स्पर्धेत तीन मुले व दोन मुलींनी सहभाग नोंदविला.

- **आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री (महाड) :**

दि. २९ ऑगस्ट २०११ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, महाड, जिल्हा रायगड येथे संपन्न झालेल्या आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धेत मुला व मुलींच्या संघ सहभागी झाला होता. मुलींच्या संघाने सांघिक गटात **प्रथम** क्रमांक पटकावला. ६ मुलींना प्रत्येकी **सुवर्ण पदक**, प्रमाणपत्र, १० गुण व महाविद्यालयासाठी चषक असे पुरस्काराचे स्वरूप आहे. महाविद्यालयाने **सलग दुस-यांदा** आंतर महाविद्यालयीन स्तरावर सुवर्ण पदकाचा मान मिळवला. वैयक्तिक गटामध्ये कु. कदम ऋषिका कृष्णा हिने **तिसरा** क्रमांक मिळवून **कांस्य पदक** व प्रमाणपत्र मिळविले. या स्पर्धेत कु. गावडे वर्षा पांडुरंग, चव्हाण विशाखा दिपक, कदम प्रज्ञा चंद्रकांत, कदम धनश्री प्रकाश, शिर्के धनश्री महादेव, कदम ऋषिका कृष्णा या सुवर्ण पदकाच्या मानकरी ठरल्या. सदर स्पर्धेत मुलांच्या सांघीक गटात महाविद्यालयाने ६ वा क्रमांक मिळविला. ९ विद्यार्थ्यांना या वर्षासाठी प्रत्येकी १० गुण मिळाले.

- **राज्यस्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धा (पुणे) :**

१२ ते १५ सप्टेंबर २०११ रोजी शिवछत्रपती क्रिडा संकुल बालेवाडी, पुणे येथे झालेल्या २५ व्या महाराष्ट्र राज्य किक बॉक्सींग स्पर्धेत कु. सुशिल सुधीर पवार (एस.वाय.बी.ए.) याने ८६ कि.ग्रॅ. वजनी गटात **सुवर्ण पदक** मिळविले.

- **आंतर वर्गीय कॅरम स्पर्धा (पाटपन्हाळे) :**

दि. २४ व २५ सप्टेंबर २०११ रोजी महाविद्यालयीन स्तरावर कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. मुलांच्या गटात २४ तर मुलींच्या गटात १० मुलींनी सहभाग नोंदविला. मुलांच गटामध्ये जय सुभाष काजरोळकर (एस.वाय.बी.कॉम.) विजेता तर धनंजय भरत विखारे (एस.वाय.बी.ए.) उपविजेता ठरला. मुलींच्या गटामध्ये कु. शिंदे रूपाली आनंदराव (एस.वाय.बी.कॉम.) विजेती तर कु. जाधव क्रांती दशरथ (एस.वाय.बी.कॉम.) उवविजेती ठरली.

- **वार्षिक क्रिडा स्पर्धा (पाटपन्हाळे) :**

दि. १५, १६ व १७ डिसेंबर २०११ रोजी महाविद्यालयाच्या वार्षिक क्रिडा स्पर्धा विद्यार्थ्यांच्या उत्स्फुर्त प्रतिसादामुळे उत्साहाने घेण्यात आल्या. कबड्डी, खो-खो, क्रिकेट या सांघिक स्पर्धांमध्ये सर्वच वर्गांनी सहभाग नोंदविला. धावणे, थाळी फेक, गोळा फेक या वैयक्तिक स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त असा प्रतिसाद मिळाला.

- **राष्ट्रीय किक बॉक्सिंग स्पर्धा (दिल्ली) :**

दि. १८ ते २२ जानेवारी २०१२ रोजी दिल्ली येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय किक बॉक्सिंग स्पर्धेमध्ये कु. सुशिल सुधीर पवार (एस.वाय.बी.ए.) याने ८६ कि.ग्रॅ. वजनी गटात **कास्य पदक** मिळविले.

- **आंतरमहाविद्यालयीन कॅरम स्पर्धा ( मुंबई) :**

दि. १४ फेब्रुवारी २०१२ रोजी कांदिवली येथे संपन्न झालेल्या आंतरमहाविद्यालयीन कॅरम स्पर्धेत महाविद्यालयाने एकेरी व दुहेरी अशा दोन्ही गटांमध्ये सहभाग नोंदविला. दुहेरी गटामध्ये कु. जय काजरोळकर व धनंजय विखारे यांनी उपांत फेरीपर्यंत धडक मारली.

- **राज्यस्तरीय कराटे स्पर्धा (पुणे) :**

दि. १६ ते १९ फेब्रुवारी रोजी पुणे येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेमध्ये कु. सुशिल सुधीर पवार (एस.वाय.बी.ए.) याने ८५ कि.ग्रॅ. वजनी गटात **रौप्य पदक** मिळविले.

सन २०११-१२ या वर्षात आंतरमहाविद्यालयीन स्तरावर ७ पदके, राज्यस्तरावर २ पदके व राष्ट्रीय स्तरावर १ पदक मिळवून महाविद्यायातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली.